लोकसत्ता ५.५.१.

# वसईत अनधिकृत शाळांवर कारवाईचा बडगा

## ३० शाळांवर गुन्हे दाखल, तर २० शाळा बंद

**कल्पेश भोईर, लोकसत्ता**



**वसई :** अनधिकृत शाळांच्या विरोधात वसईच्या शिक्षण विभागाने कारवाईला सुरुवात केली आहे. शहरातील ३० शाळांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर २० शाळा बंद करण्यात आल्या आहेत.

वसई विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. त्यापाठोपाठ आता शिक्षण विभागाची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत शाळा सुरू करण्याचे प्रमाणही वाढले आहे. मागील वर्षी वसईत १२७ शाळा अनधिकृत असल्याचे समोर आले होते. या अनधिकृत शाळांमुळे पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ लागली आहे. या अनधिकृत शाळांना पायबंद घालण्यासाठी पुन्हा एकदा शिक्षण विभागाने कारवाईची मोहीम जोरात सुरू केली आहे. सुरुवातीला शहरातील अनधिकृत शाळांना शिक्षण विभागाने नोटिसा पाठविल्या होत्या. त्यानंतर शाळेसमोर शाळा अनधिकृत असल्याचे फलक लावणे, जनजागृती करणे असे उपक्रम राबविण्यात आले होते. मात्र तरीही शहरात अनधिकृत शाळा सुरूच आहेत. या शाळांवर थेट गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत ३० शाळांवर पोलीस ठाण्यात जाऊन गुन्हे दाखल केले आहेत. यात पेल्हार १७, कळंब ८, मालजीपाडा ४ आणि दहिसर १ अशा चार केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या शाळांचा यात समावेश आहे. तर २० शाळा बंद केल्या आहेत. नालासोपारा येथील दोन शाळांकडून एक लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. असे वसईच्या शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे. काही शाळांनी परवानगी घेण्यास सुरुवात केली आहे. १५ शाळांना आता मान्यता मिळाली आहे. ७ शाळांना इरादा पत्र मिळाले असून त्यांची परवानगीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र अजूनही ज्या अनधिकृत शाळा आहेत त्याच्या विरोधात कारवाई करण्याची मोहीम सुरूच राहणार असल्याचे वसईच्या गटशिक्षणाधिकारी माधुरी पाटोळे यांनी सांगितले आहे.

### अनधिकृत शाळांचे सर्वेक्षण सुरू करणार

दरवर्षी शाळा सुरू होण्याआधी अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध केली जाते. जेणेकरून पालक व विद्यार्थी यांची फसवणूक होऊ नये. यासाठी वसई तालुक्यात पुन्हा एकदा अनधिकृत शाळांची शोधमोहीम सुरु केली जाणार आहे. याशिवाय ध्वनिवर्धकाद्वारे अशा शाळेत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये अशी जनजागृती केली जाणार आहे.

> “अनधिकृत शाळांवर टप्प्याटप्प्याने कारवाई सुरूच आहे. त्यांना नोटिसा देण्यापासून ते गुन्हेही दाखल करवून घेत आहोत. पालकांनीही अशा अनधिकृत शाळेत आपल्या मुलांना प्रवेश देऊ नये, असे आवाहन करीत आहोत. –माधुरी पाटोळे, गटशिक्षणाधिकारी, वसई तालुका

म-टा-५-५-१.

# खासगी क्लासच्या वादातून तिघांना बेदम मारहाण

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरमध्ये एका खासगी क्लासच्या वादातून एका शिक्षकासह इतर दोघांना बेदम मारहाण केल्याची घटना नुकतीच घडली आहे. या प्रकरणी भाईंदरच्या नवघर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, भाईंदरच्या नवघर भागात पंकज सिंग हे विवेक राय व त्यांचा भाऊ भुरणेद्र यांच्यासोबत मागील अनेक वर्षांपासून एका खासगी क्लास चालवत होते. करोनाकाळात या तिघांमध्ये आर्थिक गोष्टींवरून वाद झाल्याने हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयासमोर सादर करण्यासाठी क्लासचे चित्रीकरण करण्यासाठी सिंग हे आपला भाऊ व मित्रासह काही दिवसांपूर्वी क्लासच्या ठिकाणी गेले होते. यावेळी या तिघांना विवेक राय व त्यांचा भाऊ भुरणेद्र यांनी मारहाण केली. यात सिंग हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले होते. राय बंधूंविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

सकाळ पा-नं-२.

# भटक्या कुत्र्यांचा द्वेष करणे हे सभ्यपणाचे लक्षण नाही

## उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

मुंबई, ता. २८ : भटक्या कुत्र्यांचा द्वेष करणे आणि त्यांना इजा पोहोचवणे हे सुसंस्कृत समाजाचे लक्षण असू शकत नाही, असे आज मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणात सुनावले. न्यायालयात सर्रासपणे फिरणाऱ्या मांजरींचे उदाहरण देऊन प्राणीदेखील समाजाचा घटक आहेत आणि आपणच त्यांची काळजी घ्यायला हवी, असा सूचक सल्ला खंडपीठाने दिला.



कांदिवलीतील पारोमिता पर्थम यांनी सोसायटीच्या आवारात कुत्र्यांना खायला घालण्यासाठी स्वतंत्र जागा देण्याची मागणी केली होती; मात्र सोसायटीच्या वतीने याला नकार देण्यात आला. पारोमिता या अठरा कुत्र्यांचा सांभाळ करत आहेत. पारोमिता यांच्याविरोधात सोसायटीच्या कार्यकारिणीने बाऊन्सर नियुक्त केल्याचा आरोप करण्यात आला; मात्र सोसायटीच्या वतीने याचे खंडन करण्यात आले. त्यावर आज न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आर. एन. लड्डा यांच्या खंडपीठाने सुनावणी घेताना न्यायालयातील मांजरी आणि भटक्या कुत्र्यांचा उल्लेख केला. उच्च न्यायालयात ठिकठिकाणी मांजरी बसलेल्या दिसतात. तुम्ही त्यांना बाहेर सोडून या, त्या पुन्हा परत येतील. कर्मचारी, न्यायाधीश आणि वकील त्यांची काळजी घेतात, याचेही उदाहरण न्या. कुलकर्णी यांनी सुनावणीवेळी दिले.

### सहमतीने तोडगा काढा

केंद्र सरकारने भटक्या प्राण्यांना इजा पोहोचविण्याविरोधात कायदा केला आहे. त्यामुळे जर सोसायटीच्या समितीने किंवा रहिवाशांनी प्राण्यांबरोबर चुकीचे वर्तन केल्यास ते सुसभ्य समाजाचे लक्षण ठरणार नाही आणि ती कृती कायदेशीर नसेल, असा इशारा खंडपीठाने दिला. याबाबत सोसायटीचे सदस्य आणि याचिकादारांनी सहमतीने प्रश्न सोडवावा, असे निर्देश न्यायालयाने दिले. भटक्या प्राण्यांना खाऊ घालण्यासाठी विशिष्ट ठिकाणे हवीत, असे मत खंडपीठाने व्यक्त केले.

लोकसत्ता पु.पा-३.

# चिंचोटी-भिवंडी रस्त्यासाठी आज आंदोलन

## ठिकठिकाणी रास्ता रोको

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** चिंचोटी- कामण- भिवंडी रस्त्याची अद्याप दुरुस्ती करण्यात आली नसल्याने त्याविरोधात येथील नागरिकांकडून बुधवारी आंदोलन करण्यात येणार आहे. या वेळी या रस्त्यावर विविध ठिकाणच्या भागात रास्ता रोको केला जाणार आहे.

चिंचोटी - कामण - भिवंडी रस्त्यावर जागोजागी पडलेले खड्डे आणि धुळीच्या साम्राज्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र, दरवेळी फक्त आश्वासन देऊन तात्पुरता मलमपट्टी केली जाते. त्यामुळे रस्त्याची दुरवस्था कायम आहे. या रस्त्यावरील प्रवास धोकादायक बनल्यामुळे नागरिक संतप्त झाले असून, त्यांनी बुधवारी कामण - चिंचोटी - भिवंडी रस्त्यावरील खारबाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

जोपर्यंत संपूर्ण रस्ता सुस्थितीत होत नाही, तोपर्यंत सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा मालोडी येथील टोल नाका त्वरित बंद करावा, नवीन काँक्रीट रस्त्याचे काम 'एमएमआरडी'एमार्फत सुरू करावे, या रस्त्याच्या दुरवस्थेला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांचे निलंबन करून कारवाई करावी, अशा प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत. दरम्यान, या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पु-पा-३,

# अमलीपदार्थ तस्करांना ठोकल्या बेड्या

## ४ लाखांचा गांजा जप्त

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा परिसरात गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या दोन तस्करांना अमलीपदार्थ विरोधी कक्षाने बेड्या ठोकल्या आहेत. या आरोपींकडून २२ किलो ८० ग्रॅम वजनाचा ४ लाख ४१ हजार ६०० रुपयांचा गांजा जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

मिरा-भाईंदर परिसरात अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या इसमांविरुद्ध कारवाई करण्यात येते. अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि. अमर मराठे हे पोलीस पथकासह काशिमिरा परिसरात मंगळवारी गस्त करत असताना काशिमीरा नाक्याकडे येणाऱ्या सर्विस रोडवर, पेट्रोल पंपाच्या बाजूला दोन इसम संशयास्पद स्थितीत उभे असल्याचे दिसले. त्यांना ताब्यात घेऊन एकाची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ११.०९० किलो ग्रॅम वजनाचा २२१,८०० रुपये किमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. त्याला नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रॉकी अच्छेलाल गौड असे सांगितले तसेच त्याच्या बरोबर असलेल्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे १०.९९० किलो ग्रॅम वजनाचा २,१९,८०० रुपये किमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळून आला. त्याला नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सचिन गौरीप्रसाद कुमार असून ते दोघेही धानिवबाग, नालासोपारा (पूर्व) येथे राहत असल्याचे सांगितले.




या दोघांना अटक करून त्यांच्याकडे मिळून आलेला २२.०८० किलो ग्रॅम वजनाचा ४,४१,६०० रु. किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. त्या दोघांविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदयाच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाणे करत आहे. ही कारवाई अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोनि अमर मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

सकाळ पु-पा-१.

# वसईत काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन

विरार, ता. २८ (बातमीदार) : वसई-विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे भाजप आणि मोदी सरकारच्या भ्रष्टाचार, संविधानाचा अपमान, लोकशाहीची पायमल्ली आणि राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केल्याच्या निषेधार्थ पापडी येथील हुतात्मा स्मारक येथे आंदोलन करण्यात आले.

राहुल गांधी यांच्यावर गुजरातमध्ये खोट्या केस दाखल करून मोदी सरकारने राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केली. त्याचा निषेध करण्यासाठी तसेच संविधान, लोकशाही वाचवण्यासाठी एक दिवसीय सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मिरा रोडमधून २२ किलो गांजा जप्त

भाईंदर, ता.२८ (बातमीदार): अमली पदार्थ विरोधी कक्षाने मिरा रोड येथे कारवाई करून दोन व्यक्तींकडून बावीस किलो गांजा जप्त केला आहे.

पोलिस निरीक्षक अमर मराठे मिरा रोड येथे गस्त घालत असताना दोन व्यक्ती संशयास्पदपणे उभे असलेले दिसले. झडती घेतली असता त्यांच्याकडे सुमारे साडे चार लाखांचा २२ किलो गांजा आढळला. रॉकी गौड व सचिन कुमार अशी त्यांची नावे असून ते नालासोपारा येथे राहतात. याप्रकरणी काशी मिरा पोलिस तपास करत आहेत.

Scanned with CamScanner


पुण्यनगरी पृ-पा-४.

# वरसावे खाडीवरील उड्डाणपूल वाहनांसाठी खुला

## वाहतूक कोंडीची समस्या सुटणार!

**मीरा रोड :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वरसावे येथील खाडीवर बांधण्यात आलेल्या नव्या पुलाची एक मार्गिका सोमवारी सायंकाळपासून वाहनांसाठी खुली करण्यात आली आहे. हा पूल सुरू झाल्यामुळे या ठिकाणी असलेली वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वरसावे खाडीवर असलेला उड्डाणपूल कमकुवत झाला होता. तसेच त्या पुलाला काही ठिकाणी तडे गेले होते. या पुलावरून मुंबई, ठाणेवरून वसई-विरार व सुरतकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या चार वर्षांपूर्वी या खाडीवर नवीन पूल बांधण्याचे काम सुरू करण्यात आले होते. या पुलाला विविध विभागाच्या परवानग्या घेण्यासाठी बराचसा वेळ गेला. त्यानंतर आलेल्या कोरोना महामारीमुळे उड्डाणपुलाचे काम रखडले होते. या पुलाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. या उड्डाणपुलाची मुंबई व ठाण्याकडून गुजरातकडे जाणारी एक मार्गिका खुली करण्यात आली आहे. याचे लोकार्पण मंगळवारी सायंकाळी आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. केंद्रीय



मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबत ट्विट करून सूचना दिल्या होत्या. उड्डाणपुलाच्या दुसऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण करण्यासाठी वर्सोवा नाक्यावरील वाहतुकीचा ताण कमी होणे आवश्यक असल्यामुळे ही मार्गिका खुली करण्यात आली आहे. उड्डाणपुलाची एक मार्गिका खुली केल्यामुळे वाहनचालकांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. दुसऱ्या मार्गिकेचे काम लवकर पूर्ण करून मे अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल व नवीन पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे खुला केला जाईल, असे प्राधिकरणाचे प्रकल्प महाव्यवस्थापक मुकुंद अत्तरडे यांनी सांगितले. बहुप्रतीक्षित वरसावे खाडीवरील उड्डाणपूल सुरू झाल्यामुळे त्याचा लाखो वाहन चालकांना मोठा फायदा होणार आहे. उड्डाणपूल खुला झाल्यानंतर त्यावरून जाणाऱ्या वाहन चालकांनी समाधान व्यक्त केले.

सामना पा.नं.२.

**घाटकोपर कोठडी मृत्यू प्रकरण**

# तीन पोलिसांवर खुनाचा खटला चालवण्याचे आदेश

**मुंबई, दि. २८ (प्रतिनिधी) –** घाटकोपर पोलीस ठाण्यात सप्टेंबर २००९ मध्ये घडलेल्या कोठडीतील मृत्यू प्रकरणात तीन पोलिसांवर खुनाचा खटला चालवा, असे आदेश उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाला दिले आहेत. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक संजय खेडेकर, हेड कॉन्स्टेबल रघुनाथ कोळेकर आणि पोलीस नाईक सयाजी ठोंबरे अशी आरोपी पोलिसांची नावे आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे त्यांच्या अडचणीत मोठी भर पडली आहे.

घाटकोपर पोलिसांच्या कोठडीत असताना मृत्यू झालेल्या २२ वर्षीय अल्ताफ कादिर शेखची आई मेहरुनिसाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मेहरुनिसाच्या वतीने ॲड. युग चौधरी यांनी बाजू मांडली. अल्ताफचा खून झाल्याचा दाट संशय आहे. त्याच्या शरीरावरील जखमांचा पुरावा नष्ट करण्यासाठी पंचनाम्यामध्ये फेरफार करण्यात आला. तसेच न्यायालयाच्या निर्देशानंतरही सीबीआयने पोलिसांविरोधातील हत्येचा आरोप वगळला, असा दावा ॲड. चौधरी यांनी केला. मेहरुनिसाने २०१८ मधील सत्र न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले होते. तिच्या याचिकेची गंभीर दखल घेत न्यायमूर्ती पी. डी. नाईक यांच्या खंडपीठाने अल्ताफच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी तीन पोलिसांविरुद्ध खुनाचा आरोप निश्चित करण्याचे आदेश सत्र न्यायालयाला दिले.

Scanned with CamScanner

म. टा. पा. नं. १ व ९.

# पोलिस भरतीत 'पळ'वाटा

## वेळ नोंदवणारी चिप बदलण्याचे प्रकार; आणखी सहा जणांवर गुन्हे

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

मुंबईत ठिकठिकाणी पोलिस भरती सुरू असून त्यात कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी अद्ययावत प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. असे असतानाही उमेदवारांकडून गैरप्रकार सुरूच आहेत. धावण्याची वेळ अचूक नोंदवता यावी, यासाठी पायावर बांधण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक चिपची उमेदवारांकडून आपापसात अदलाबदली केली जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी आणखी सहा उमेदवारांवर तीन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत.

मुंबई पोलिस दलातील ७,०७६ कॉन्स्टेबल पदासाठी सुमारे ५ लाख ८१ उमेदवार मैदानात उतरले आहे. ३१ जानेवारीपासून या पदांसाठी मैदानी चाचणी सुरू (पान १४वर)




### अहमदनगरच्या उमेदवाराचा मृत्यू

पोलिस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून अहमदनगर येथून मैदानी चाचणीसाठी मुंबईत आलेल्या विकास काळे (२८) या तरुणाचा मंगळवारी मृत्यू झाला. मरोळ येथील मैदानावर सर्व धावण्या पूर्ण केल्यानंतर घरी जाण्याच्या तयारीत असतानाच विकास खाली कोसळला. भरतीसाठी आलेल्या उमेदवाराच्या मृत्यूची मुंबईतील ही तिसरी घटना आहे. ➤ वृत्त...४

### असा होतो गैरप्रकार

- प्रत्येक उमेदवाराच्या दोन्ही पायाला दोन चिप लावतात.
- दोन्ही चिपचा क्रमांक आणि उमेदवाराचा क्रमांक यांची नोंद घेतली जाते.
- धावण्याच्या आधी परिचयाचे उमेदवार एका चिपेची अदलाबदल करतात.
- दोघांपैकी एक कुणीतरी आधी पोहोचतो आणि स्वयंचलित पद्धतीने चिपेच्या क्रमांकावर वेळ नोंदवली जाते.
- जो उमेदवार आधी पोहोचतो, त्याच्या दुसऱ्या पायावर अन्य उमेदवाराचीही चिप असते.
- उशिरा पोहोचूनही दुसऱ्या उमेदवाराला आधी पोहोचलेल्या उमेदवाराची वेळ मिळते.

## पोलिस भरतीत 'पळ'वाटा

(जोड पानावरून)

करण्यात आली आहे. नायगाव आणि मरोळ येथील मैदानाबरोबर मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील मैदानातही ही चाचणी सुरू आहे. धावण्याच्या १००, ८०० आणि १६०० मीटर चाचणीत वेळेचे योग्य निरीक्षण नोंदवण्यासाठी उमेदवारांच्या पायामध्ये इलेक्ट्रॉनिक चिप बसवण्यात आल्या आहेत. मात्र उमेदवार या चिपची अदलाबदल करीत असल्याचे समोर आल्यानंतर मार्चच्या पहिल्या आठवड्यात आठ जणांविरुद्ध पवई पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले होते.

अनेक उमेदवारांच्या मैदानी चाचणीच्या वेळेबाबत आक्षेप उपस्थित केल्यामुळे पोलिसांनी सुरुवातीपासून झालेल्या चाचण्यांचे परीक्षण सुरू केले. सीसीटीव्ही पाहणी केली असता उमेदवार पोहोचलेली वेळ आणि प्रत्यक्षात त्याच्या चीपमध्ये नोंदली गेलेली वेळ यामध्ये तफावत आढळून आली. अशा उमेदवारांची चौकशी केली असता आणखी सहा जणांनी असाच प्रकार केल्याचे दिसुन आले. या सहाही उमेदवारांवर आणखी तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

Scanned with CamScanner

लोकमत

# डेटिंग, चॅटिंग ॲपवर सुंदर चेहरे, मधुर आवाज

## तरुणांसह वृद्धांचीही होते फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : इंटरनेटच्या माध्यमातून विविध सोयी-सुविधा पुरवणारा मोबाइल आर्थिक आणि चारित्र्याच्या दृष्टिकोनातून अतिशय धोकादायक बनला आहे. अनेकांना विविध ऑनलाइन डेटिंग आणि चॅटिंग ॲपवरील सुंदर चेहरे आणि मधुर आवाजाची भुरळ पडून आर्थिक नुकसानीसोबतच चारित्र्यावर डाग लागण्याच्या घटनांचा सामना करावा लागत असल्याचे प्रकार उघडीस येत आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत सायबरविषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरिता गुन्हे शाखेंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे. या विभागाने २०२२ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत २,७३८ प्रकरणात फसवणूक झालेली तब्बल ९१ लाख १४ हजार ८३३ रुपये पीडितांना परत केले आहे. काही वर्षांपूर्वी केवळ संभाषणासाठीच असलेल्या मोबाइलमध्ये गेल्या चार-पाच वर्षांत आमूलाग्र बदल झाले असून मोबाइलचे संगणकीकरण होऊन इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे विविध ॲप्सच्या माध्यमातून सेवा-सुविधा मिळू लागल्याने मोबाइल हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. मात्र, इंटरनेटवर विविध गोष्टींसाठी उपलब्ध असलेल्या हजारो ॲपच्या माध्यमातून आर्थिक फसवणुकीला पेव फुटलेले दिसत आहे.

### सायबरतज्ज्ञ काय सांगतात?

#### प्रोफाइल फोटो

ऑनलाइन डेटिंग ॲपवर अनोळखी व्यक्तीशी संपर्क साधणारे सायबर भामटे नेहमी बनावट व सुंदर प्रोफाइल फोटो वापरतात. रिव्हर्स इमेज सर्चद्वारे ही गोष्ट ओळखता येऊ शकते.

#### बँक खाते माहिती

अनोळखी व्यक्ती उत्पन्नाच्या माहितीविषयी रस दाखवत असेल तर अशा लोकांपासून सावध राहणे आवश्यक आहे. कोणालाही आपले बँक खाते तपशील, क्रेडिट, डेबिट कार्ड, मोबाइल ॲपचे कोड कोणालाही सांगू नये.

Hello Vasai
Page No. 2 Mar 29, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# फर्जी सर्टिफिकेट से बनवाया पासपोर्ट

**निसं, नालासोपाराः** तुलिंज पुलिस ने फर्जी सर्टिफिकेट के आधार पर अपना पासपोर्ट बनवाने वाली एक महिला के खिलाफ भादंवि की विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया है। पासपोर्ट विभाग में महिला ने स्कूल का फर्जी सर्टिफिकेट जमा कराया था। पुलिस अब शहर में सक्रिय फर्जी दस्तावेज बनाने वाले गिरोह का पता लगाने में जुटी है।

**पुलिस ने किया महिला पर धोखाधड़ी का मामला दर्ज**

जानकारी के अनुसार, रहमत नगर में रहनेवाली महिला हलीमा आरिफ पियारजी ने एक महीने पहले अपना पासपोर्ट बनवाने के लिए पासपोर्ट विभाग में अप्लाई किया था। 9 मार्च को जब उसकी फाइल तुलिंज पुलिस स्टेशन में वेरिफिकेशन के लिए आई, तो दस्तावेजों की पड़ताल में उसका स्कूल सर्टिफिकेट नकली पाया गया। महिला की जन्म तारीख में छेड़छाड़ की गई थी। पुलिसकर्मी विक्रम पन्हालकर की शिकायत पर हलीमा के खिलाफ धोखाधड़ी का मामला दर्ज किया गया है।

Scanned with CamScanner

# पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा २ एप्रिलला

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पोलीस शिपाई व चालक पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी पोलीस चालक पदाची लेखी परीक्षा २६ मार्चला घेण्यात आली असून, २ एप्रिलला पोलीस शिपाई पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा सुभाष चंद्रबोस मैदान व स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान या ठिकाणी घेण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाच्या मार्फत देण्यात आली आहे. लेखी परीक्षेसाठी एकूण १२,१२७ पात्र उमेदवार असून, त्यापैकी ३,२६९ महिला व ८८५८ पुरुष आहेत. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान याठिकाणी महिलांची लेखी परीक्षा घेण्यात येणार असून, पुरुषांची लेखी परीक्षा सुभाष चंद्रबोस मैदान येथे घेण्यात येणार आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पोलीस शिपाई व चालक पदांसाठी २ जानेवारीला थेट भरती प्रक्रियेला सुरुवात झाली होती. मुला-मुलींची शारीरिक चाचणी पूर्ण झाली आहे. पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर प्रथमच थेट भरती होत आहे. ९९६ पदांच्या जागासाठी ही भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या पदांसाठी सुमारे ७१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या ७१ हजार ९५१ अर्जांमध्ये ५९ हजार ८४७ पुरुष व १२ हजार १०४ महिला उमेदवारांचा समावेश होता. भरती करता आलेल्या अर्जदारांपैकी एकूण ४९,४७९ जणांनी भरती प्रक्रियेत त्यांची उपस्थिती दर्शवत मैदानी शारीरिक चाचणी पार पाडली. मैदानी शारीरिक चाचणीमध्ये ३५,९५६ उमेदवार पात्र ठरले, तर १३,५२३ उमेदवार शारीरिक चाचणी परीक्षेत अपात्र ठरले होते. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यालयामध्ये रविवारी सकाळी ०९.०० ते १०.३० या वेळेत चालक पोलीस भरती लेखी परीक्षा घेण्यात आली. चालक पोलीस भरती लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या १०४ उमेदवारांपैकी परीक्षेसाठी ९९ उमेदवार हजर होते. लेखी परीक्षा व्हेरिफिकेशन, बायोमेट्रिक, फ्रिस्किंग, सीसीटीव्ही, व्हिडीओ ग्राफी, उचित बंदोबस्तासह पारदर्शकपणे घेण्यात आली असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाच्या मार्फत देण्यात आली आहे. लेखी परीक्षेच्या पोलीस बंदोबस्तासाठी वरिष्ठ अधिकारी, तसेच ७ पोलीस निरीक्षक, २२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ४२ पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर हजर होते.

Scanned with CamScanner

## वसई-विरार के नागरिकों को मिला ट्रैफिक से छुटकारा

# अतिक्रमण से मुक्त हुआ हाइवे का मुख्य मार्ग!

■ **निसं, विरार:** वसई-विरार की सड़कों पर बड़े पैमाने पर किए गए अतिक्रमणों से हो रही परेशानी से नागरिकों को अब छुटकारा मिल गया है। सड़कों और फुटपाथों पर अवैध फेरीवालों और रिक्शाचालकों का कब्जा होने से भारी ट्रैफिक हो रही थी। इस समस्या को लेकर 23 फरवरी को नवभारत टाइम्स ने 'चालीस फीट की रोड पर कर लिया गया बीस फीट अतिक्रमण' शीर्षक से एक खबर प्रकाशित की थी। इस खबर का मानव आयोग मुंबई ने संज्ञान में लिया था। आयोग ने संबंधित विभागों को समन जारी किया था। आयोग के समन के बाद हरकत में आए विभागों ने अतिक्रमण करने वालों पर कड़ी कार्रवाई शुरू की और बड़े पैमाने पर अतिक्रमणों को हटा दिया। जानकारी के अनुसार, विभागीय अधिकारियों की लापरवाही के चलते विरार स्टेशन से मुंबई-अहमदाबाद हाइवे को जोड़ने वाले मुख्य मार्ग पर फेरीवालों, गैरेज, सर्विस सेंटर और दुकानदारों ने अतिक्रमण कर लिया था। यहां चालीस फीट की रोड पर बीस फीट सड़क पर अवैध अतिक्रमण किया गया था। इससे आए दिन छोटे-बड़े हादसे हो रहे थे। साथ ही ट्रैफिक जाम से लोगों को काफी परेशानी हो रही थी। मानव आयोग का समन मिलने के बाद पुलिस और मनपा प्रशासन ने अतिक्रमण हटाने का काम शुरू किया।

NBT असर



मानव आयोग के समन के बाद पुलिस और मनपा प्रशासन हरकत में आया।

## अवैध निर्माण करने वालों पर MRTP दर्ज

■ **निसं, विरार:** विरार पूर्व के मनवेल पाडा में अवैध निर्माण करनेवालों के खिलाफ एमआरटीपी का केस दर्ज हुआ है। मनपा प्रशासन से बिना किसी अनुमति लिए ही आठ दुकानों का निर्माण किया गया था। जमीन मालिक और बिल्डर के खिलाफ एमआरटीपी के तहत केस दर्ज हुआ है।

जानकारी के अनुसार, मनवेल पाडा में संत नगर इलाके में सर्वे नंबर 227 पर बिल्डर आफताब मिर्जा और जमीन मालिक ने बिना परमिशन के ही आठ दुकानों एवं एक रूम का निर्माण अवैध तरीके से किया था। स्थानीय लोगों की शिकायत के बाद संबंधित विभाग के सहायक आयुक्त सुरेश पाटील ने सोमवार को विरार पुलिस स्टेशन में दोनों के खिलाफ एमआरटीपी के तहत केस दर्ज कराया।

Scanned with CamScanner

दैनिक
मुंबई केसरी टाइम्स
R.N.I. NO MAHHIN/2008/25162
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : 290 बुधवार २९ मार्च २०२३ मूल्य 2 रुपया Post-Reg- No. PLG/249/2023/2025 पृष्ठ : 04

# नालासोपारा से मिरारोड गए थे गांजा बेचने,धर दबोचे गए २ गांजा तस्कर

**वसई** ; एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत एंटी-नारकोटिक्स सेल की टीम ने काशिमीरा पुलिस स्टेशन क्षेत्र में गांजा तस्कर पर कार्रवाई की है।इस कार्रवाई में सेल ने २२ किलो अधिक गांजा जप्त कर आरोपी को गिरफ्तार किया है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में एंटी-नारकोटिक्स सेल के पी.आई अमर मराठे व सपोनि.विलास कुटे की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है।पुलिस ने बताया कि मीरा-भाईदर,वसई-विरार पुलिस कमिश्नरेट के अंतर्गत



मीरारोड (पूर्व) क्षेत्र में नशा तस्करों के खिलाफ कार्रवाई के तहत वरिष्ठों द्वारा मौखिक आदेश दिए गए,जिंसके बाद २८ मार्च को एंटी-नारकोटिक्स सेल के पी.आई अमर मराठे,सपोनि.अमोल अंबावणे,पोहवा टक्के,विष्णुदेव घरबुडे,पो.शि.यादव आदि पुलिस टीम पेट्रोलिंग के रवाना हुई, इस दौरान मिरारोड (पूर्व) इलाके से रॉकी अच्छेलाल गौंड उम्र २१ वर्षे, एम.एस.चाल,गणेश नगर,धानिवबाग,नालासोपारा (पूर्व) को हिरासत में लिया,छानबीन के दरम्यान सेल की टीम ने उक्त शख्स के पास से २.२१.८००/- रुपये मूल्य का ११.०९० किलोग्राम वजन गांजा का बरामद किया व सचिन गोटीप्रसाद कुमार उम्र २२ वर्ष,गणेश नगर,धानिवबाग,नालासोपारा (पूर्व) के पास २.१९.८००/- रुपये मूल्य का १०.९९० किलोग्राम वजन गांजा का बरामद किया,पुलिस ने बताया कि बरामद की गई है कि उक्त मादक पदार्थ बिक्री के लिए आया था,कुलमिलाकर कार्रवाई में २२.०८० किलोग्राम (कीमत ४.४१.६०० रुपये ) गांजा बरामद किया गया है। हालांकि आरोपी के खिलाफ काशिमीरा पुलिस स्टेशन में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है।आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

Scanned with CamScanner

# नवीन वर्सोवा पुलाची एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली

भाईंदर - वर्सोवा येथे वसई खाडीवर बांधण्यात आलेल्या नवीन पुलाचे काम पूर्ण झाले असून, सोमवार सायंकाळी ७ च्या सुमारास त्याचे उद्‌घाटन करण्यात आले असून, वाहनचालकासाठी नवीन वर्सोवा पुलाची एक मार्गिका खुली करण्यात आली आहे. मुंबई ते सूरत, ठाणे ते सूरत ही वाहिनी वाहन चालकांसाठी सुरू करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. पुलाच्या उद्‌घाटनाच्या वेळी पोलीस आयुक्त, उपायुक्त, वाहतूक विभाग सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नवीन वर्सोवा पुलाची एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली झाल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्ग व ठाणे कडे जाणाऱ्या घोडबंदर मार्गाचे वर्सोवा नाका हे मुख्य जंक्शन आहे. नवीन पूल फाऊंटन हॉटेल समोरील पेट्रोल पंपापासून सुरू होऊन ससूननगरपर्यंत असा एकूण २ ते २.३० किलोमीटरचा आहे. नवीन पूल सुरू झाल्यानंतर चौकाच्या कामासाठी काही दिवसांनी सुरुवात करण्यात येणार आहे. वर्सोवा खाडीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून नवीन पुलाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू करण्यात आले होते, मात्र कोरोनाच्या काळात काम बंद असल्याने व काही इतर तांत्रिक अडचणीमुळे दिलेला कालावधी पूर्ण झाल्या नंतरही नवीन पुलाचे काम पूर्ण होण्यास विलंब लागला होता. वर्सोवा खाडीच्या पाण्यात नवीन पूल बांधण्याचे काम सुरू असल्याने थोडाफार कालावधी अधिक लागला असला, तरी नवीन पुलामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

Scanned with CamScanner